Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय - ब्रेक द चेन - सुधारित मार्गदर्शक सूचना व महाविद्यालयातील उपस्थिती बाबत.**

**संदर्भ-** १) महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्र. डीएमयू/२०२०/सीआर.९२/डी.एम-१,दि.०४/०६/२०२१,दि.१७/०६/२०२१,दि.१६/०६/२०२१ व दि.२५/०६/२०२१.

२) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय. मुंबई यांचेकडील क्र.कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५, दि.११/०८/२०२१ रोजीचा आदेश.

३) जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/४३९/२०२१ दि.१३/०८/२०२१

४) विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आस्थापना WH-०१ / दि.१७ जून, २०२१ मा. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांचे अध्यक्षतेखाली दि.२०/८/२०२१ रोजी मा. जिल्हा अधिकारी, कोल्हापूर, सांगली व सातारा यांच्या समवेत बैठक.

५) मा. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांचे अध्यक्षतेखाली दि. २०/८/२०२१ रोजी मा. जिल्हा अधिकारी, कोल्हापूर, सांगली व सातारा यांच्या समवेत बैठक.

सर्व सलंग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, राज्यात कोविड-१९ ची दुसरी लाट आटोक्यात येत आहे. पंरतु अद्यापी कोविड रूग्ण आढळून येत असल्याने राज्यात कोविड प्रतिबंधक उपाययोजना करण्याची आवश्यकता भासत असल्याने अध्यक्ष, राज्य व्यवस्थापन समितीने उपरोक्त संदर्भीय क्र.२ अन्वे उपरोक्त संदर्भीय क्र. १ मधील महाराष्ट्र शासनाचे आदेश अधिक्रमित करून संपूर्ण राज्यासाठी सुधारित निर्देश पारित केले आहेत. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी उपरोक्त संदर्भीय क्र.३ अन्वये आदेश पारित केलेले आहेत.

त्याअनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालये यांची निकड लक्षात घेता शैक्षणिक व महाविद्यालयीन कामकाज दिनांक १/१०/२०२१ पासून शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या १०० टक्के उपस्थितीने नियमीत वेळेत पूर्ण क्षमतेने सुरू राहिल. तसेच, सर्व शिक्षक, व शिक्षकेत्तर सेवकांनी कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण प्राधान्याने पूर्ण करून घ्यावे.

उपरोक्त संदर्भीय क्र.२ व ३ आदेशामधील निर्बंध/सुट व अटी शर्ती अवलोकनी घेवून महाविद्यालयांनी आवश्यकती कार्यवाही व उपाय योजनांची अंमलबजावणी करावी.

(डॉ. विलास द. नांदवडेकर )
कुलसचिव

जा.क्र. सलंग्नता टी-१ विभाग/680
दि.२९/९/२०२१ 30 SEP 2021

प्रति,

मा.प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालयांना/ शिक्षण संस्था अग्रेषित .

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत,
१० मजला, मुंबई - ४००००१.
क्रमांक : कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५,
दिनांक : ११ऑगस्ट, २०२१.

---

संदर्भ :-

१) साथरोग अधिनियम, १८९७.
२) आपत्ती निवारण कायदा, २००५.
३) भारतीय दंडसंहिता, १८६०.
४) महसूल व वन, आपत्ती निवारण मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्र. डीएमयू-२०२०/प्र.क्र.९२/आपत्ती-१, दि. ४ जून, १७ जून व २५ जून, २०२१.
५) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन समक्रमांक दिनांक २ ऑगस्ट, २०२१ चे आदेश.

**आदेश**

**ब्रेक द चेन - सुधारित मार्गदर्शक सूचना**

ज्याअर्थी, राज्यात कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे साथरोग कायदा, १८९७ ची अंमलबजावणी सुरु आहे. ज्याअर्थी, राज्यात कोविड-१९ साथरोगामुळे आपत्ती व्यवस्थापन कायद्याची अंमलबजावणी सुरु आहे.

ज्याअर्थी, राज्यात कोविड-१९ ची दुसरी लाट आटोक्यात येत आहे. परंतु अद्यापही कोविड रुग्ण आढळून येत असल्याने राज्यात कोविड प्रतिबंधक उपाययोजना करण्याची आवश्यकता भासत आहे.

त्याअर्थी, आता साथरोग अधिनियम, १८९७ च्या खंड-२ नुसार प्राप्त अधिकार व आपत्ती निवारण कायदा, २००५ नुसार सक्षम प्राधिकारी म्हणून अध्यक्ष, राज्य व्यवस्थापन समिती या आदेशाद्वारे उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ व ५ मध्ये नमुद आदेश अधिक्रमित करून संपूर्ण राज्यासाठी खालील निर्देश पारित करीत आहे :-

**१) लोकलट्रेन सुविधा सुरु करणेबाबत -**

लोकलट्रेन सुविधा वापरासाठी खालील अटी व शर्तीचे पालन करणे आवश्यक राहिल :-

अ) आरोग्य सेवा देणारे अधिकारी / कर्मचारी / अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी तसेच कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा व दुसरी मात्रा (डोस) घेऊन १४ दिवस पूर्ण झालेल्या नागरिकांनाच लोकलट्रेन प्रवास अनुज्ञेय करण्यात येत आहे.

ब) ज्या कर्मचारी अथवा नागरिक यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा आणि दुसरी मात्रा घेतल्यानंतर १४ दिवस पुर्ण झाले आहे त्यांना लसीकरणाच्या अंतिम प्रमाणपत्राच्या आधारे लसीकरण प्रमाणपत्र व आस्थापनांच्या ओळखपत्रासह स्वतंत्रपणे राज्यशासनाने ठरवून दिलेल्या यंत्रणेमार्फत विहीत कार्यपध्दतीने (ऑनलाईन/ऑफलाईन) प्रमाणित केलेल्या ओळखपत्र धारकानांच लोकलट्रेन प्रवासासाठी मासिक/त्रैमासिक पास देण्यात यावेत. (असे प्रमाणित ओळखपत्र प्राप्त करण्याबाबतच्या तपशीलवार व स्वयंस्पष्ट सूचना प्राधिकाऱ्यांकडून स्वतंत्रपणे प्रसारीत करण्यात येत आहे.)

क) रेल्वे तिकिट तपासनीस यांना लसीकरण पूर्ण झाल्याचे नमूद केलेले ओळखपत्र तपासण्याचा अधिकार असेल. ज्या प्रवाशांकडे असे ओळखपत्र नसेल किंवा प्रवाशांकडून ओळखपत्र खोटे आढळल्यास त्यांच्याकडून तसेच ज्यानी खोटे प्रमाणपत्र प्रमाणीत केले असेल त्यांचेकडून रु. ५००/- इतका दंड तसेच भारतीय दंड संहिता १८६० नुसार कारवाई करण्यात यावी.

**२) उपहारगृहे -**

खुली अथवा बंदिस्त उपहारगृहे आसन व्यवस्थेच्या ५० टक्के क्षमतेने खालील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून सुरु करण्याची मुभा देण्यात येत आहे.

अ) उपहारगृह/बारमध्ये प्रवेश करताना, प्रतिक्षा कक्षात अथवा जेवण मिळेपर्यंतच्या कालावधीत मास्कचा वापर अनिवार्य राहिल व याबाबतच्या स्पष्ट सूचना उपहारगृह आस्थापनांनी उपहारगृहात लावणे आवश्यक राहिल.

फ) उपहारगृह/बारमध्ये काम करणारे आचारी, वाढपे, व्यवस्थापक व स्वच्छता कर्मचाऱ्यांसह सर्व कर्मचाऱ्यांचे कोविड प्रतिबंधक लसीकरण करणे आवश्यक राहिल व ज्या कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाच्या दोन मात्रा आणि दुसरी मात्रा घेतल्यानंतर १४ दिवस पुर्ण झाले आहे **असेच** कर्मचारी व व्यवस्थापक उपहारगृह/बारमध्ये काम करु शकतील तसेच या सर्व कर्मचारी व व्यवस्थापनाने उपहारगृहात मास्कचा वापर करणे अनिवार्य राहिल.

क) वातानुकुलित उपहारगृह/बार असल्यास, वायुवीजनासाठी खिडक्या असल्यास कमीत कमी दोन खिडक्या किंवा दरवाजा उघडा ठेवून आतील हवा खेळती राहण्यासाठी पंखे लावणे आवश्यक राहिल.

ड) प्रसाधनगृहातही उच्च क्षमतेचा एक्झॉस्ट फॅन असणे आवश्यक राहिल.

इ) उपहारगृह/बारमध्ये विहित शारिरीक अंतराचे पालन होईल यानुसारच आसन व्यवस्था करण्यात यावी.

फ) उपहारगृह/बारमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच सॅनिटायझरची व्यवस्था असणे आवश्यक राहिल.
उपरोक्तनुसार उपहारगृहे/बार सुरु ठेवण्यास सर्व दिवस रात्री १०.०० वा. पर्यंत मुभा देण्यात येत आहे. उपहारगृह/बारमधील भोजनासाठी ग्राहकांकडून शेवटची मागणी जास्तीत जास्त रात्री ९.०० वाजेपर्यंत घ्यावी. मात्र पार्सल सेवा २४ तास सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे.

३) **दुकाने :-**

राज्यातील सर्व व्यापारी दुकाने सर्व दिवस रात्री १०.०० वा. पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. दुकानात काम करणाऱ्या सर्व व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा पूर्ण व दुसरी मात्रा झाल्यानंतर १४ दिवसाचा कालावधी पूर्ण होणे आवश्यक राहिल.

४) **शॉपिंग मॉल्स :-**

राज्यातील सर्व शॉपिंग मॉल्स सर्व दिवस रात्री १०.०० वा. पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. तथापि, शॉपिंग मॉलमध्ये काम करणाऱ्या सर्व व्यवस्थापन व कर्मचारी आणि प्रवेश करणाऱ्या सर्व नागरिकांचेही कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण व दुसरी मात्रा घेऊन १४ दिवस पूर्ण झालेले असणे आवश्यक राहिल व तसे लसीकरण प्रमाणपत्र व त्यासमवेत फोटोसहीत ओळखपत्र प्रवेशद्वारावर दाखविणे आवश्यक राहील.

५) **जिम्नॅशिअम, योगसेंटर, सलून-स्पा :-**

अ) वातानुकुलित तसेच विनावातानुकुलित जिम्नॅशिअम, योगसेंटर, सलून-स्पा ५० टक्के क्षमतेने सर्व दिवस रात्री १०.०० वा. पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. तथापि, उक्त संस्था वातानुकूलीत असल्यास, वायुविजनासाठी फॅन व वातानुकूलनासह खिडकी अथवा दरवाजा उघडा ठेवणे आवश्यक राहील.

६) **इनडोअर स्पोर्टस :-**

इनडोअर स्पोर्ट्स असलेल्या ठिकाणी खेळाडूंचे व तेथील कर्मचारी व व्यवस्थापन यांच्या कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण व दुसरी मात्रा झाल्यानंतर १४ दिवस झालेले असणे आवश्यक राहील. तसेच, या ठिकाणी हवा खेळती राहण्यासाठी योग्य वायुविजन व्यवस्था असणे आवश्यक राहील. या ठिकाणी खेळाडूना बॅडमिंटन,टेबलटेनिस, स्क्वॅश, पॅरलल बार, मलखांब अशाच खेळांसाठी केवळ दोन खेळाडू या मर्यादेत सुरु करण्याची मुभा देण्यात येत आहे.

७) **कार्यालय / औद्योगिक / सेवाविषयक आस्थापना :-**

अ) सर्व शासकीय / निमशासकीय आस्थापनांचे कर्मचारी, बँक कर्मचारी, रेल्वे व म्युनिसिपल कर्मचारी व व्यवस्थापन यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण प्राथम्याने पुर्ण करण्यात यावे

ब) ज्या खाजगी व औद्योगिक आस्थापनांच्या कर्मचाऱ्यांचे व व्यवस्थापनांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण पुर्ण झालेले असेल त्या आस्थापनांना पुर्ण क्षमतेने सुरू ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे.

क) सर्व आस्थापनांनी गर्दी टाळण्यासाठी शक्यतो विविध सत्रात कर्मचाऱ्यांना बोलावून कामाचे व्यवस्थापन करावे ज्या आस्थापना वरील कर्मचाऱ्यांना घरून काम करणे शक्य आहे अशा सर्व आस्थापनांच्या व्यवस्थापनांनी कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची मुभा द्यावी कार्यालयात काम करणे आवश्यक असल्यास

कर्मचाऱ्यांचा गर्दीच्या वेळी प्रवास टाळणे शक्य होईल अशा प्रकारे कार्यालयीन वेळेचे व्यवस्थापन करण्यात यावे.

ड) तसेच खाजगी कार्यालयाना वेळेचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्यालये २४ तास सूरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. मात्र अशा सत्र व्यवस्थापनांतर्गत कार्यालयांना एका सत्रात कार्यालयातील एकूण कर्मचारी संख्येच्या २५ टक्के उपस्थिती मर्यादित करणे आवश्यक राहील.

८) राज्यातील सर्व मैदाने, उद्याने, चौपाट्या, समुद्रकिनारे स्थानिक प्राधिकरणाने विहित केल्यानुसार त्यांच्या नियमित वेळेत सुरु राहतील.

९) **विवाह सोहळे:-**

अ) खुल्या प्रांगणातील /लॉन वरील किंवा बंदिस्त मंगल कार्यालयातील विवाह सोहळे संबंधित प्रांगण/लॉन/ मंगल कार्यालय/ हॉटेल मधील आसन व्यवस्थेच्या ५० टक्के क्षमतेने व कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे संपूर्ण पालन होईल या अटीवर मंगल कार्यालयाच्या प्रयोजनार्थ सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे.

ब) खुल्या प्रांगण/लॉन मध्ये होणाऱ्या विवाह सोहळ्यास उपस्थितांची संख्या प्रांगण किंवा लॉन क्षमतेच्या ५० टक्के परंतु जास्तीत जास्त २०० व्यक्ती या मर्यादेत असेल.

क) बंदिस्त मंगल कार्यालय /हॉटेलमध्ये उपस्थितांची संख्या क्षमतेच्या ५० टक्के परंतु जास्तीत जास्त १०० व्यक्ती या मर्यादित असेल.

ड) मात्र कोणत्याही परिस्थीतीत कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन केले जात आहे याची खातरजमा करण्यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे व आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्याला तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. या निर्बंधांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तसेच संबंधित हॉटेल/ कार्यालयांवर दंडनीय कारवाई तसेच संबंधित हॉटेल / मंगल कार्यालयाचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

इ) तसेच मंगल कार्यालय/हॉटेल/लॉन व्यवस्थापन/भोजन व्यवस्थापन/बँडपथक/भटजी/फोटोग्राफर्स अशा विवाह व्यवस्थेशी संबंधीत सर्व संलग्न संस्था यामधील व्यवस्थापक व कर्मचारी यांचेही कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण पुर्ण होऊन दुसरी मात्रा घेतल्यानंतर १४ दिवस पुर्ण होणे अनिवार्य राहील व त्यानुसार ओळखपत्रासह लसीकरण प्रमाणपत्र सोबत असणे आवश्यक राहील.

१०) **सिनेमागृहे व मल्टिप्लेक्स :-**

राज्यात सिनेमागृह/नाट्यगृह, मल्टिप्लेक्स ( स्वतंत्र तसेच शॉपिंग मॉलमधील ) पुढील आदेशापर्यंत बंद राहतील.

११) धार्मिक स्थळे :-

राज्यातील सर्व धार्मिक स्थळे पुढील आदेशापर्यंत नागरिकांसाठी बंद राहतील.

१२) आंतरराज्य प्रवास :-

ज्या नागरिकांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण पूर्ण झाले आहे त्या नागरिकांना, बाहेरच्या राज्यातून महाराष्ट्र राज्यात प्रवेश करण्यासाठी आरटीपीसीआर चाचणीची आवश्यकता नसेल. अन्य प्रवाशांसाठी ७२ तास पुर्वीची आरटीपीसीआर चाचणी निगेटीव्ह किंवा १४ दिवस विलगीकरण आवश्यक राहिल.

१३) कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्यात गर्दी व्यवस्थापन करण्याबाबत केंद्र शासनाने तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केले आहे. यास्तव गर्दी / जमाव टाळण्यासाठी वाढदिवस, राजकीय, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम, निवडणूक प्रचार सभा, रॅली, मोर्चे, इ. वरील निर्बंध कायम राहतील.

१४) मेडीकल ऑक्सीजनची उपलब्धता मर्यादीत असल्याने, जर राज्यातील रुग्णसंख्या वाढल्यास व कोविड रुग्णांच्या उपचारासाठी प्रतिदिन ७०० मे. टन किंवा व त्यापेक्षा जास्त ऑक्सीजन लागत असल्यास संपूर्ण राज्यात तात्काळ पूर्णपणे लॉकडाऊन घोषित करुन त्यानुसार कठोर निर्बंध लागू करण्यात येतील.

१५) राज्यातील सर्व नागरिकांना कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना जसे की, मास्कचा वापर, हातांची स्वच्छता, शारिरीक अंतराचे पालन, इतरत्र थुंकण्यास प्रतिबंध, इ. सर्व निर्बंधांचे पालन करणे अनिवार्य राहिल.

१६) सर्व दुकाने, कार्यालये, औद्योगिक आस्थापना, उपहारगृहे, बार व मॉल मालक/ व्यवस्थापनाने त्यांचे आस्थापनेवर कार्यरत असलेल्या व्यवस्थापक तसेच कर्मचाऱ्यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा पुर्ण होऊन १४ दिवस झाल्याची खातरजमा करावी व या कर्मचाऱ्यांची यादी (लसीकरण माहिती/प्रमाणपत्रासह) तयार ठेवावी व सक्षमप्राधिकाऱ्यांनी तपासणी साठी मागणी केल्यास त्यांना उपलब्ध करुन द्यावी.

१७) दुकाने/उपहारगृहे/बार/मॉल्सचे/कार्यालये/औद्योगिक आस्थापना यांचे नियतकालीक निर्जंतूकीकरण व सॅनीटायझेशन करण्याची जबाबदारी संबंधीत मालकाची व व्यवस्थापनाची असेल. तसेच, यामध्ये कर्मचारी तसेच ग्राहकांचे तापमान घेण्यासाठी इन्फ्रारेड/ कॉन्टॅक्टलेस थर्मामिटर याची व्यवस्था करण्यात यावी. तसेच यामध्ये मास्क डिस्पेंसर व बायोमेडीकल वेस्ट (वापरलेले मास्क व टिशु पेपर्स इत्यादीची विल्हेवाट) जमा करण्याची व विहित कार्यपध्दतीने विल्हेवाटीसाठी देण्याची जबाबदारी संबंधीत आस्थापनांची असेल.

१८) उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा उल्लंघन केल्यास संबंधितांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, साथरोग अधिनियम आणि भारतीय दंडसंहिता, १८६० मधील तरतूदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१९) सदर आदेश दि. १५ ऑगस्ट, २०२१ पासून अंमलात येतील.

राज्यपालांचे नावाने व आदेशानुसार.

११/८/२१

( सीताराम कुंटे )
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई.
६) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई. (सर्व)
८) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९) मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) सर्व सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव यांचे स्वीय सहाय्यक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) आयुक्त (आरोग्य सेवा) व अभियान संचालक, एनएचएम, मुंबई.
१४) धर्मदाय आयुक्त, एम.एस. मुंबई.
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य विमा संस्था, वरळी, मुंबई.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) सर्व जिल्हाधिकारी.
१८) सर्व महानगरपालिका आयुक्त.
१९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२०) संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे.
२१) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
२२) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
२३) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
२४) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व).
२५) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
२६) जिल्हा हिवताप अधिकारी (सर्व).
२७) निवड नस्ती (आ-५).

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००२
दुरध्वनी क्रमांक : 0231-2659232 टोल फ्री (1077)
Email: rainkolhapur@gmail.com

जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/आरआर/427/2021 दिनांक :-13/08/2021

**वाचले :-**

1. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897.
2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,
3. भारतीय दंड संहीता 1860.
4. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य-5, दिनांक 13/03/2020, 14/03/2020 तसेच 15/03/2020 रोजीच्या अधिसुचना.
5. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 23 व 24 मार्च 2020.
6. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU /2020/CR.92/DisM-1, दि. 04/06/2021, दि. 17/06/2021 व दि. 25/06/2021 रोजीचे आदेश.
7. सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : कोरोना-2021/प्र.क्र.366/आ-5, दिनांक 02/08/2021 रोजीचा आदेश.
8. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्रमांक : कोरोना-2021/प्र.क्र.366/आ-5, दि. 11/08/2021 रोजीचा आदेश.

---

## विषय :- ब्रेक द चेन — सुधारित मार्गदर्शक सूचना.

## -: आदेश :-

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील उपरोक्त वाचले क्र. 8 अन्वये, राज्यात कोविड-19 च्या प्रादुर्भावामुळे साथरोग कायदा, 1897 व आपत्ती व्यवस्थापन कायद्याची अंमलबजावणी सुरु आहे. राज्यात कोविड-19 ची दुसरी लाट आटोक्यात येत आहे. परंतु अद्यापही कोविड रुग्ण आढळून येत असल्याने राज्यात कोविड प्रतिबंधक उपाययोजना करण्याची आवश्यकता भासत असल्याने साथरोग अधिनियम, 1897 च्या खंड 2 नुसार प्राप्त अधिकार व आपत्ती निवारण कायदा, 2005 नुसार सक्षम प्राधिकारी म्हणून अध्यक्ष, राज्य व्यवस्थापन समिती या आदेशाद्वारे शासनाकडील दिनांक 4 जून, 17 जून, 25 जून व 2 ऑगस्ट, 2021 चे आदेश अधिक्रमित करुन संपूर्ण राज्यासाठी निर्देश पारित केलेले आहेत.

त्यानुसार साथरोग अधिनियम 1897 मधील कलम 2 आणि आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील अधिकारांस अनुसरून, मी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर जिल्ह्यात **दिनांक 15/08/2021 रोजी पासून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.**

| अ.क्र. | सेवा / आस्थापना / उपक्रम | निर्बंध / सुट व अटी शर्ती |
|---|---|---|
| 1. | **उपहारगृहे :-** | खुली अथवा बंदिस्त उपहारगृहे आसन व्यवस्थेच्या 50 टक्के क्षमतेने खालील अटीच्या पूर्ततेच्या अधीन राहून सुरु करण्याची मुभा देण्यात येत आहे.<br>अ) उपहारगृह/बारमध्ये प्रवेश करताना, प्रतिक्षा कक्षात अथवा जेवण मिळेपर्यंतच्या कालावधीत मास्कचा वापर अनिवार्य राहिल व याबाबतच्या स्पष्ट सूचना उपहारगृह आस्थापनांनी उपहारगृहात लावणे आवश्यक राहिल.<br>ब) उपहारगृह/बारमध्ये काम करणारे आचारी, वाढपे, व्यवस्थापक व स्वच्छता कर्मचाऱ्यांसह सर्व कर्मयाऱ्यांचे कोविड प्रतिबंधक लसीकरण करणे आवश्यक राहिल व ज्या कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाच्या दोन मात्रा आणि दुसरी मात्रा घेतल्यानंतर 14 दिवस पुर्ण झाले आहे तसेच कर्मचारी व व्यवस्थापक उपहारगृह/बारमध्ये काम करु शकतील तसेच या सर्व कर्मचारी व व्यवस्थापनाने उपहारगृहात मास्कचा वापर करणे अनिवार्य राहिल.<br>क) वातानुकुलित उपहारगृह/बार असल्यास, वायुवीजनासाठी खिडक्या असल्यास कमीत कमी दोन खिडक्या किंवा दरवाजा उघडा ठेवून आतील हवा खेळती राहण्यासाठी पंखे लावणे आवश्यक राहिल. |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | ड) प्रसाधनगृहातही उच्च क्षमतेचा एक्झॉस्ट फॅन असणे आवश्यक राहिल. इ) उपहारगृह/बारमध्ये विहित शारिरीक अंतराचे पालन होईल यानुसारच आसन व्यवस्था करण्यात यावी. फ) उपहारगृह/बारमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच सॅनिटायझरची व्यवस्था असणे आवश्यक राहिल. उपरोक्तनुसार उपहारगृहे/बार सुरु ठेवण्यास सर्व दिवस रात्री 10.00 वा. पर्यंत मुभा देण्यात येत आहे. उपहारगृह/बारमधील भोजनासाठी ग्राहकांकडून शेवटची मागणी जास्तीत जास्त रात्री 9.00 वाजेपर्यंत घ्यावी. मात्र पार्सल सेवा 24 तास सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. |
| 2. | दुकाने :- | राज्यातील सर्व व्यापारी दुकाने सर्व दिवस रात्री 10.00 वा. पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. दुकानात काम करणाऱ्या सर्व व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा पूर्ण व दुसरी मात्रा झाल्यानंतर 14 दिवसाचा कालावधी पूर्ण होणे आवश्यक राहिल. |
| 3. | शॉपिंग मॉल्स :- | जिल्ह्यातील सर्व शॉपिंग मॉल्स सर्व दिवस रात्री 10.00 वा. पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. तथापी, शॉपींग मॉलमध्ये काम करणा-या सर्व व्यवस्थापन व कर्मचारी आणि प्रवेश करणाऱ्या सर्व नागरीकांचेही कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण व दुसरी मात्रा घेवून 14 दिवस पूर्ण झालेले असणे आवश्यक राहिल व तसे लसीकरण प्रमाणपत्र व त्यासमवेत फोटोसहीत ओळखपत्र प्रवेशव्दारावर दाखविणे आवश्यक राहिल. |
| 4. | जिम्नॅशिअम, योगसेंटर, सलून-स्पा :- | वातानूकूलित तसेच विना वातानूकूलित जिम्नॅशियम, योगसेंटर, सलून-स्पा 50 टक्के क्षमतेने सर्व दिवस रात्री 10.00 पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. तथापी, उक्त संस्था वातानूकूलित असल्यास, वायुविजनासाठी फॅन व वातानुकूलनासह खिडकी अथवा दरवाजा उघडा ठेवणे आवश्यक राहील. |
| 5. | इनडोअर स्पोर्टस :- | इनडोअर स्पोर्टस असलेल्या ठिकाणी खेळाडूंचे व तेथील कर्मचारी व व्यवस्थापन यांच्या कोवीड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण व दुसरी मात्रा झाल्यानंतर 14 दिवस झालेले असणे आवश्यक राहील. तसेच, या ठिकाणी हवा खेळती राहण्यासाठी योग्य वायुविजन व्यवस्था असणे आवश्यक राहील. या ठिकाणी खेळाडूना बॅडमिंटन, टेबलटेनिस, स्क्वॉश, पॅरलल बार, मल्लखांब अशाच खेळासाठी केवळ दोन खेळाडू या मर्यादेत सुरु करण्याची मुभा देण्यात येत आहे. |
| 6. | कार्यालय / औद्योगिक / सेवाविषयक आस्थापना :- | अ) सर्व शासकीय/निमशासकीय आस्थापनांचे कर्मचारी, बँक कर्मचारी, रेल्वे व म्युनिसिपल कर्मचारी व व्यवस्थापन यांचे कोवीड प्रतिबंधात्मक लसीकरण प्राथम्याने पुर्ण करण्यात यावे. ब) ज्या खाजगी व औद्योगिक आस्थापनांच्या कर्मचा-यांचे व व्यवस्थापनांचे कोवीड प्रतिबंधात्मक लसीकरण पुर्ण झालेले असेल त्या आस्थापनांना पुर्ण क्षमतेने सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. क) सर्व आस्थापनांची गर्दी टाळण्यासाठी शक्यतो विविध सत्रात कर्मचाऱ्यांना बोलावून कामाचे व्यवस्थापन करावे. ज्या आस्थापनावरील कर्मचा-यांना घरुन काम करणे शक्य आहे अशा सर्व आस्थापनांच्या व्यवस्थापनांनी कर्मचा-यांना घरुन काम करण्याची मुभा घ्यावी. कार्यालयात काम करणे आवश्यक असल्यास कर्मचा-यांचा गर्दीच्या वेळी प्रवास टाळणे शक्य होईल अशा प्रकारे कार्यालयीन वेळेचे व्यवस्थापन करण्यात यावे. ड) तसेच खाजगी कार्यालयांना वेळेचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्यालये 24 तास सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. मात्र अशा सत्र व्यवस्थापनांतर्गत कार्यालयांना एका सत्रात कार्यालयातील एकूण कर्मचारी संख्येच्या 25 टक्के उपस्थिती मर्यादित करणे आवश्यक राहील. |
| 7. | सर्व मैदाने, उद्याने, चौपाट्या :- | स्थानिक प्राधिकरणाने विहित केल्यानुसार त्यांच्या नियमित वेळेत सुरु राहतील. |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ८. | **विवाह सोहळे :-** | अ) खुल्या प्रांगणातील/लॉन वरील किंवा बंदीस्त मंगल कार्यालयातील विवाह सोहळे संबंधित प्रांगण/लॉन/मंगल कार्यालय/हॉटेल मधील आसन व्यवस्थेच्या 50 टक्के क्षमतेने व कोवीड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे संपूर्ण पालन होईल या अटीवर मंगल कार्यालयांच्या प्रयोजनार्थ सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे.<br>ब) खुल्या प्रांगण/लॉन मध्ये होणाऱ्या विवाह सोहळ्यास उपस्थितांची संख्या प्रांगण किंवा लॉन क्षमतेच्या 50 टक्के परंतु जास्तीत जास्त 200 व्यक्ती या मर्यादेत असेल.<br>क) बंदीस्त मंगल कार्यालये/ हॉटेलमध्ये उपस्थितांची संख्या क्षमतेच्या 50 टक्के परंतु जास्तीत जास्त 100 व्यक्ती या मर्यादीत असेल.<br>ड) मात्र कोणत्याही परिस्थितीत कोवीड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन केले जात आहे याची खातरजमा करण्यासाठी व्हिडीओ रेकॉर्डिंग करणे व आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिका-याला तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. या निर्बंधांचे उल्लंघन करणा-यांवर तसेच संबंधित हॉटेल/कार्यालयावर दंडनीय कारवाई तसेच संबंधित हॉटेल/मंगल कार्यालयांचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.<br>इ) तसेच मंगल कार्यालय/हॉटेल/लॉन व्यवस्थापन/भोजन व्यवस्थापन /बँडपथक /भटजी/फोटोग्राफर्स अशा विवाह व्यवस्थेशी संबंधित सर्व संलग्न संस्था यामधील व्यवस्थापक व कर्मचारी यांचेही कोवीड प्रतिबंधात्मक लसीकरण पुर्ण होवून दुसरी मात्रा घेतल्यानंतर 14 दिवस पुर्ण होणे अनिवार्य राहील व त्यानुसार ओळखपत्रासह लसीकरण प्रमाणपत्र सोबत असणे आवश्यक राहील. |
| 9. | **सिनेमागृहे व मल्टिप्लेक्स :-** | राज्यात सिनेमागृह/नाटयगृह, मल्टिप्लेक्स (स्वतंत्र तसेच शॉपींग मॉलमधील) पुढील आदेशापर्यंत बंद राहतील. |
| 10. | **धार्मिक स्थळे :-** | सर्व धार्मिक स्थळे पुढील आदेशापर्यंत नागरिकांसाठी बंद राहतील. |
| 11. | **आंतरराज्य प्रवास :-** | ज्या नागरिकांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण पूर्ण झाले आहे त्या नागरिकांना बाहेरच्या राज्यातून महाराष्ट्र राज्यात प्रवेश करण्यासाठी आरटीपीसीआर चाचणीची आवश्यकता नसेल. अन्य प्रवाशांसाठी 72 तास पुर्वीची आरटीपीसीआर चाचणी निगेटिव्ह किंवा 14 दिवस विलगीकरण आवश्यक राहिल. |
| 12. | कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जिल्ह्यात गर्दी व्यवस्थापन करण्याबाबत केंद्र शासनाने तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केले आहे. यास्तव गर्दी / जमाव टाळण्यासाठी वाढदिवस, राजकीय, धार्मिक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम, निवडणूक प्रचार सभा, रॅली, मोर्चे इ. वरील निर्बंध कायम राहतील. | |
| 13. | जिल्ह्यातील सर्व नागरिकांना कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना जसे की, मास्कचा वापर, हातांची स्वच्छता, शारिरीक अंतराचे पालन, इतरत्र थुंकण्यास प्रतिबंध, इ. सर्व निर्बंधांचे पालन करणे अनिवार्य राहिल. | |
| 14. | सर्व दुकाने, कार्यालये, औद्योगिक आस्थापना, उपहारगृहे, बार व मॉल मालक / व्यवस्थापनाने त्यांचे आस्थापनेवर कार्यरत असलेल्या व्यवस्थापक तसेच कर्मचाऱ्यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा पुर्ण होऊन 14 दिवस झाल्याची खातरजमा करावी व या कर्मचाऱ्यांची यादी (लसीकरण माहिती / प्रमाणपत्रासह) तयार ठेवावी व सक्षमप्राधिकाऱ्यांनी तपासणी साठी मागणी केल्यास त्यांना उपलब्ध करुन द्यावी. | |
| 15. | दुकाने/उपहारगृहे/बार/मॉल्सचे/कार्यालये/औद्योगिक आस्थापना यांचे नियतकालीक निर्जतुकीकरण व सॅनीटायझेशन करण्याची जबाबदारी संबंधीत मालकांची व व्यवस्थापनांची असेल. तसेच, यामध्ये कर्मचारी तसेच ग्राहकांचे तापमान घेण्यासाठी इन्फ्रारेड/ कॉन्टॅक्टलेस थर्मामिटर याची व्यवस्था करण्यात यावी. तसेच यामध्ये मास्क डिस्पेंसर व बायोमेडीकल वेस्ट (वापरलेले मास्क व टिशु पेपर्स इत्यादीची विल्हेवाट) जमा करण्याची व विहित कार्यपध्दतीने विल्हेवाटीसाठी देण्याची जबाबदारी संबंधीत आस्थापनांची असेल. | |

सदर आदेशाची अंमलबजावणी त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी वार्ड निहाय / प्रभाग निहाय तपासणी पथके स्थापन करुन करणेची आहे तसेच सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ अथवा उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती अथवा आस्थापनां विरुध्द भारतीय दंड संहीता 1860 (45) याच्या कलम 188, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 व साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतुदी प्रमाणे दंडात्मक / फौजदारी / परवाना रद्द करणेबाबतची कारवाई करण्याचे अधिकार त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांना देणेत येत आहेत.

10/08/21

(राहूल रेखावार भा.प्र.से.)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर

Scanned by CamScanner

प्रति :- सर्व नागरिक व आस्थापना कोल्हापूर जिल्हा.

प्रत :- १. आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
३. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
४. धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर
५. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर
६. प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर
७. सहा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, कोल्हापूर
८. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, कोल्हापूर
९. प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि. महामंडळ, कोल्हापूर
१०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर
११. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर
१२. सहायक कामगार आयुक्त, कोल्हापूर / इचलकरंजी
१३. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
१४. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)
१५. गट विकास अधिकारी (सर्व)
१६. मुख्याधिकारी (सर्व) नगरपालिका / नगरपरीषद / नगरपंचायत.
१७. सर्व ग्रामपंचायती.
१८. जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर यांचेकडे उपरोक्त आदेश जनतेच्या माहितीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व दैनिक/दृकश्राव्य माध्यमातून ठळक बातमी स्वरुपात प्रसिध्द करुन, प्रसिध्दी अहवाल इकडे द्यावा.
१९. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे यांचेकडे महाराष्ट्र राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी व त्याच्या प्रती पुरविणेसाठी रवाना.

Scanned by CamScanner